**MHLA090027022019**

<u>नियमित फौजदारी खटला नं.२८७/२०१९ निशाणी ३६ वरील आदेश</u>

(आरती वि. शंकर)

प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीचा एच.बी.सी. चा पुरावा मा.न्यायालयाने दि.२२/०२/२०२२ रोजी बंद केलेला आहे. तो आदेश रद्य होवून त्यांचा एच.बी.सी. चा पुरावा दाखल करुन घेणेबाबत सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. फिर्यादी हा मागील तारखेस बाहेरगावी जवळच्या नातेवाईकांच्या साखरपुड्याचा कार्यक्रम होता म्हणून मा. न्यायालयासमोर हजर राहून साक्षीदार देवू शकले नाहीत. म्हणुन मे.साहेबांनी अर्जदार यांच्याविरुध्द पुरावा बंदचा आदेश केलेले आहे. सदर फिर्यादी यांना सदर प्रकरणात अधिकचा पुरावा देणे कामी अर्जदार फिर्यादीविरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्य करुन फिर्यादी सदर प्रकरणात साक्षीदार देणेची परवानगी देणे न्यायाचे व जरुरीचे आहे. तसे नाही झाले तर फिर्यादीचे कधीही न भरुण येणारे नुकसान होणार आहे. म्हणून मे.साहेबांनी अर्जदार यांचा अर्ज मंजुर करुण फिर्यादीस अधिकचा पुरावा देणेची परवानगी देणे न्यायाचे व जरुरीचे आहे.

३. आरोपी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे देवून अर्जातील नमुद सर्व कथन नाकारले आहे व पुढे असे कथन केले आहे की, सदर प्रकरणातील फिर्यादी हे मे.न्यायालयामध्ये एच.बी.सी. पुर्वीचे साक्षीदार दि.१६/११/२०२१ रोजी पहिले साक्षीदार घेतलेले आहे. त्यानंतर मे.न्यायालयाने फिर्यादीचा

दि.०१/१२/२०२१, ०६/१२/२०२१ व १८/०१/२०२२ रोजी पर्यंत साक्षीपुरावा देणेसाठी भरपुर संधी दिली होती. त्यानंतर दि.२२/०२/२०२२ रोजी साक्षीपुरावा बंद करण्याचा आदेश केलेला होता. म्हणजे फिर्यादीला भरपुर संधी देवूनही जाणूनबुजून पुरावा न देण्याचा आणि फक्त आरोपीला त्रास देण्याच्या उद्येशाने व मॅटर कसे प्रलंबित राहिल या उद्येशाने हा set-aside चा अर्ज दिलेला आहे. करीता फिर्यादीचा हा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. युक्तिवाद ऐकला. अर्ज व म्हणणे वाचले. फिर्यादी यांनी सदरच्या प्रकरण गुन्हा कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दाखल केला आहे. सदरच्या प्रकरणात अवलोकनावरुन असे दिसून येते की, त्यांना वारंवार संधी देवूनही देखील त्यांनी सदर प्रकरणात त्यांनी त्यांचा पुरावा दिला नाही म्हणून माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.२२/०२/२०२२ रोजी फिर्यादी यांचा पुरावा बंद केला आहे. तरी सदर प्रकरणातील स्वरुप पाहात जर फिर्यादी यांना साक्षीदार देण्याची संधी दिली नाही तर त्यांचे नुकसान होणार आहे. म्हणून फिर्यादी यांच्या सदरच्या अर्ज मंजूर करण्याच्या निष्कर्षास आले आहे. सबब, आदेशः-

## आदेश

फिर्यादी यांचा नि.क्र.३६ कडील अर्ज दंड र.रु.३००/- ने मंजूर करण्यात आला आहे.

Digitally signed by JYOTIMALA CHANDRASHEKHAR GUPTA
Date: 2022.07.14 17:15:03 +0530

ठिकाण - उदगीर. (श्रीमती जे.सी.गुप्ता)
दिनांक-१४/०७/२०२२ प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी, उदगीर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Kendre L.S. |
| Court | : | Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Udgir. |
| Date | : | 14.07.2022. |
| Order signed by the Presiding officer on | : | 14.07.2022. |
| Order uploaded on | : | 14.07.2022. |